म. ग्रं. सं. ठाणे
विषय
अ. नं. ४४३

# मनोहरलीला.

( खंडकाव्य. )

लेखक.

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी,
शेंदुर्णीकर

REFBK-0001827

किंमत ६ आणे.

REFBK-0001827

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

# मनोहरलीला.

लेखक व प्रकाशक

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी-शेंदुर्णीकर,
फर्स्ट असि० मास्तर, मेहुणबारें.

( प्रथमावृत्ति, प्रति ५००. )
आगष्ट १९२०.

मुद्रक.

दत्तात्रय गोविंद सडेकर,
'धनंजय' प्रेसचे मालक;
खानापूर-बेळगांव.

( ग्रंथकर्त्यांनें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ८६ आणे.

# समर्पण.

माझे परमपूज्य जनक,

कै० आसाराम भवानीप्रसाद तिवारी,

चतुर्थाश्रमांतील

श्रीब्रह्मानंद-स्वामी

यांच्या समाधीवर अत्यंत आदरानें ही काव्यकलिका वाहिली.

त्यांचा कृपेच्छु,

दु. आ. तिवारी.





महाराष्ट्र काव्याभिमानी

**स्नेहभूषण—नाटू नारायण महाजन,**

**सावर्दें**

फोटोग्राफर—व्ही. एम. सोमण.

# मैत्रीचे चार शब्द.

या पुस्तकाच्या मुद्रणाचा सर्व खर्च देऊन निरपेक्ष बुद्धीनें ज्यांनीं मजकडून माझ्या वडिलांची ही अल्पसेवा घडवून आणिली त्या या स्नेह भूषणानें मला प्रेमबद्ध तर केलेंच पण अप्रत्यक्ष महाराष्ट्र कविता देवीचें सेवापुण्यही संपादिलें ! या सन्मित्राचे आभार मानून मोकळें होण्यापेक्षां स्वतः उपकृत राहाण्यांतच समाधान आहे.

स्नेहबद्ध,

दु. आ. तिवारी,

मेहुणबारें

॥ ॐनमश्चंडिकायै ॥

# मनोहरलीला.

## प्रस्तावना.

ते दिवस--तो काळ--ह्मणजे इ. स. १९१८ च्या आक्टोबर महिन्यातील इन्फ्लुंझाच्या भयंकर उन्मादाचा काळ होय! ता. १ आक्टोबर रोजीं या खड काव्यास आरभ होऊन गेला होता, रोज नियमानें २५ कविता करावयाचा क्रम ८ दिवस सुरळित चालला. साक्ष्यासारख्या गांवांतून रोज ४०-४५ बळी काळाच्या दाढेंत पडत होते. घरोघर दु:खाच्या आरोळ्या, विलाप आणि क्रंदनें वाढविणारी काळपुरुषाची ती विचित्र लीला डोळ्यापुढें दिसत असतां एका हातानें इष्टमित्रांची सुश्रुषा आणि दुसऱ्या हातानें मनोहरलीला काव्याचें लेखन अशीं दोन्हीं कार्यें कोणी अदृश्यशक्ति मजकडून करवीत होती.

"क्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितं"

या सुभाषिताचा अनुभव त्यावेळीं मी स्वत: घेत होतो! पण पुढें **मनोहर** आणि **लीळा** हीं ग्रंथकर्त्याचींच दोन

अपत्ये वरील ज्वरासुरानें हातीं धरून परिक्षेची वेळ आणिली ! तापानें फणफणणाऱ्या या नहीज भावडांस औषधोपचारानंतर ईश्वरावर सोंपवून देवी सरस्वतीची उपासना चालू ठेविली. हा क्रम आणखी ३।४ दिवस चालला. जों जों मनोहरलीलेचा अवतार संपावयास येत आहे ( हें काव्य शोकपर्यवसायी असल्यामुळें यांत मनोहर आणि लीला यांचा अंत झाला आहे. ) तों तों मनोहर लीलेचा आजार वाढतच आहे. हें पाहून मन जरा चरकलेंच !

असे कांही शुभाशुभवर्ण आहेत कीं, ते काव्याच्या आरंभीं आले असतां त्यांची इष्टानिष्ट फळें कवीस अनुभवावीं लागतात अशा अर्थाचा किराताच्या पहिल्याच श्लोकावरील टीकेंतील श्लोक आठवला. त्यावरून पुढें काव्यलेखन बंद करून काव्याच्या आरंभी “ श्रीमद्यदुवंशोद्भव ...” इत्यादि पहिली कविता करून ठेविली. आश्चर्य हें कीं मुलांस आराम पडून १६ व्या तारखेस यथाक्रम हें ४०० कवितांचें काव्य पुरें झालें ! ! !

पुराणकवि, महाकवि आणि संतकवि यानीं पौराणिक विषय व्यापून टाकिल्यामुळें आणि ऐतिहासिक व सामाजिक विषयांचीं वर्णनें कादंबऱ्यांच्या रूपानें विशद करण्याचा प्रघात पडल्यामुळें आधुनिक कवितेची महाकाव्यें आणि खंडकाव्यें या मार्गानें होणारी प्रगति खुंटली, आणि ती विशेषतः स्फूट रूपानेंच अवतरूं लागली. शिवाय पाश्चि-

मात्र कवींच्या काव्यकृतीचा जों जों परिचय होऊं लागला; तों तों लिरिक्स काव्याचें वळण आधुनिकांस फार लागलें असा कांहीं विद्वानाचा अभिप्राय आहे. पण इंग्रजीच्या परिचयानें मराठींत कादंबरीरूपानें गद्य लिहिण्याची प्रवृत्ति वाढली, ह्मणून ही दशा खुंटली; हें प्रमेय उलगडत नाहीं कारण गद्य तें गद्य! आणि काव्य तें काव्य!! गद्यानें कितीही वर उडी मारिली, तरी त्यास काव्यमंदिराचे शिखर गांठता येणें शक्य नाही. एक कविता किंबहुना कवितेचें एक चरण रसिकांचा हृत्सागर उचंबळविण्यास जितका समर्थ होईल; तितकीं गद्यग्रंथाचीं दहापानें होणार नाहींत. स्फूर्तीनें लिहिलेल्या कवितेची लज्जत गद्यास येणें शक्य नाहीं. संस्कृतांत कविकुलगुरूचें उत्कृष्ट असें **मेघदूत** नांवाचें खंडकाव्य आहे, कवीश्वरानें या काव्याला कोणती मंगल-वेला साधिली होती कळत नाही पण रसिक भ्रमर त्यावर सारखे गुंजारवच करीत असतात. समजा त्या काव्याचें कै० हरिभाऊ आपट्यासारख्यांनीं मराठींत भाषांतर केलें. तर खऱ्या मेघदूतास सोडून त्या गद्य मेघदूतास आवडीनें वाचणारे किती रसिक सांपडतील. कादंबऱ्यात कांहीं कांहीं भागाच्या आरंभीं ऋतुकालादिकांचा वर्णनें वाचण्यात येतात पण छे! कवीश्वराच्या ऋतुसंहारास हातांतून खालीं ठेववत नाहीं. सारांश गद्य-लेखनाचा प्रघात वाढल्यानें महाकाव्यें व खंडकाव्यें मंदावलीं हे कारण नितकेसें पटत नाही.

दुसरा आक्षेप पुराणविषयाचा. पुराण विषय धार्मिक असल्यानें धार्मिक लोकांची नैसर्गिक अभिरुचि पुराण कवितेविषयीं असेल पण खरा रसिक त्यांतील काव्याला जें महत्व देईल तें केवळ धार्मिक वर्णनाला देणार नाहीं. पुराणविषय अगोदर सामाजिक आणि ऐतिहासिकच होते. कवींनींच त्यांना धार्मिक पोषाख चढविल्यानंतर कालानें त्यांस पुराण मंदिरांत नेऊन बसविलें आहे. तेव्हां वरील दोन्ही कारणें मराठी काव्यास अवरोधक नाहींत. मग असें का? याचें उत्तर असें कीं, संस्कृत ज्ञानाच्या अभावीं आधुनिकास महाकवींच्या काव्याचा तादृश परिचय नसतो. साहित्यादिशास्त्रांचें त्यांचें अध्ययन झालेलें नसतें, ऋषिकवि सारखी वनवासवृत्ति किंवा महाकविसारखी नृपाश्रयाची स्थिति यांच्या अभावीं उदरवृत्ति आडवी येते. तात्कालिक कीर्ति किंवा लौकिक मिळविण्याच्या इच्छेनें वृत्तपत्रें आणि मासिकें यांचा स्नेह स्फूट कविता प्रसवावयाला लावतो. ह्मणून मोठमोठी सुंदर काव्यें महिनोगणती व वर्षोगणती करीत बसून त्याच्या प्रसिद्धी करितां जवळचें द्रव्य वेंचावयाचें त्यापेक्षा स्फूटकाव्यांकडे बरीच प्रवृत्ति होते. हीं व आणखीं इतर कारणें वरील गोष्टीस प्रतिकूल आहेत. कवींनीं भिन्न भिन्न स्फूटविषयांतून आपल्या प्रतिभेस खेळवून तिला जोरकस करावी मग तिच्या शक्तीचा प्रभाव खंडकाव्यांतून व महाकाव्यांतून दाखवावा. तो त्यांच्या कीर्तीचें पद अढळ करील.

हें काव्य लिहिण्यांत माझा हेतु निराळा होता. वरील अपत्यांच्या नांवावरून त्यांचा या काव्याशीं कांहीं संबंध असेल असें वाचकांस वाटेल पण तसा संबंध अगदीं नाहीं हें कथानकावरून कळेल. वैवाहिकस्थितीच्या पूर्वीं इ. स. १९१० सालीं ' मनोहर लीला ' या नांवाचें मी एक छोटेंसें पुस्तक लिहून ठेविलें होतें पण त्यांत कांहीं सुधारणा करावयाच्या असल्यानें तें अप्रसिद्धच राहिलें होतें. त्याचें कथानक हृदयस्पर्शी असल्यानें मी त्यांत थोडा फरक करून त्यास हें खंडकाव्याचें रूप दिलें आहे. एवढें सांगितल्यावर आणि कथानक पुढें ठेविल्यावर काव्याच्या गुणावगुणाचें वर्णन करणें हें माझें काम नाहीं. तें रसिकाचें.

सहा सहा महिनें पुरतील इतकीं कामें शिल्लक असल्यामुळें ' आता काम घेण्यास सवड नाहीं ' अशीं पुणें मुंबईच्या छापखान्यांचीं उत्तरें आलीं. अशावेळीं धनंजय प्रेसचे मालक श्री. दत्तात्रय गोविंद सडेकर यानीं माझें हें छपाईचें काम हातीं घेऊन तें मुद्दाम नव्या टैपांत केलें. याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

मेडुणबार्रे,
ता० ५।७।१९२०

तु० आ० तिवारी



॥ ॐ: नमश्चंडिकायै ॥

# मनोहर-लीला.

( कथानक. )

इ० स० १२९४ साली अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरी ऊर्फ दौलताबाद येथील यादववंशीय **रामदेवराव** याचा पराभव केला त्या युद्धांत **मनोहर** नांवाच्या एका तरुणानें रामदेवरायाच्या बाजूनें लढत असतां अतुल पराक्रम गाजविला, त्यामुळें रामदेवानें खूष होऊन त्यास पदरीं बाळगिला. युवराज **शंकरदेव** याचा मनोहराशीं स्नेह जुळला एके दिवशीं ते दोघे शिकारीस गेले असतां मनोहर शिकारीच्या मागें लागून एका घोर अरण्यांत सांपडला. तेथून मार्ग काढीत तो बुधगांवास जाऊन तेथील माधवराव देशमुखाकडे उतरला. देशमुखांस 'लीला' नांवाची सुस्वरूप व उपवर अशी एक कन्या होती, **मनोहर व लीला** या उभयतांच्या मनात परस्परांविषयीं अनुराग उत्पन्न झाला. पुढें माधवरावांनींही मनोहराचें वय व अधिकार पाहून आपली कन्या त्यास दिली. कालांतरानें रामदेवराव वारले व शंकरदेव गादीवर बसला. बापाच्या अंतकाळाच्या इच्छेप्रमाणें स्वातंत्र्य मिळवावें ह्मणून त्यानें यवनांशीं कलह आरंभिला. त्यांत मनोहरानें अद्वितीय पराक्रम गाजवून तो विजयी पुरुष जखमी झाला. त्या वेळीं त्याची वास्तपुस्त करायला

शंकरदेव त्याकडे जाऊं येऊं लागला असतां लीलेच्या अप्रतीम सौंदर्यानें त्यास तिच्याविषयींची अभिलाषा उत्पन्न झाली एके दिवशीं त्यानें मनोहरास काहीं दरबारी कामाकरितां कोठें पाठवून आपण आपली दुष्टवासना पुरविण्याकरितां लीलेच्या मंदिरांत शिरला. तिनें हा आपणावर बलात्कार करितो आहे असें पाहून मोठ्यानें आरोळी मारिली ! मनोहरास हा शंकरदेवाचा दुष्ट कावा कोणा विश्वासू सेवकाकडून वाटेंत कळल्यामुळें तो रात्री तेथें दबा धरून बसला होता तो ऐनवेळीं आंत आला ! व दोघांची झटापट सुरू झाली. त्यात मनोहर जखम लागून खालीं पडला. लीला ही खरी खरी पतिव्रता होती. तिनें तो भयानक देखावा पाहून पतीच्या उरातली सुरी काढून आपला शेवट करून घेतला, मरता मरतां ' तुझ्या सर्वस्वाचा नाश होईल " असा तिनें शंकरदेवास शाप दिला. तो शेवटीं खरा होऊन यादवांचें राज्य बुडालें. असा हा कथाभाग पुढील पद्यांत गोंवला आहे.

दु० आ० तिवारी.
सावदे—पू० खान्देश.

॥ ॐनमश्चंडिकायै ॥

# मनोहर-लीला.

( चाल—काठोकांठ भरूं द्या पेला. )

१८२७

* ( १ ) *

श्रीमद्यदुवंशोद्भव राजा रामदेव नृपमुकुटमणि ॥
पराभवानें खिन्न होउनि लागे देवाच्या चरणीं ॥
दिल्लिपतीचा अल्लाउद्दिन, देवगिरीचा काळ महा ॥
रायाच्या खिन्नतेस कारण झाला होता तोच अहा ! ॥
अभ्रामध्यें रवि सांपडता अंधुक छाया पसरावी ॥
ग्रहण लागता निशिनाथाला निष्प्रभ गगनश्री व्हावी ॥
प्रभंजनानें महालतेची विकलस्थिति होउन जावी ॥
अदय कराने विकसित कलिका खुरडुनि खालीं टाकावी ॥
पानें सारीं गळून यावी विहीनता वनराजीला ॥
वर्षाकालापूर्वीं यावी मलीनता कीं धरणीला ॥
शिशिरसमीरें सरोजिनीची व्हावी विच्छिन्नता जशी ॥
यादव राज्यश्रीची झाली गतवैभव शोभा तैशी ॥
वृद्ध रामराजाचे अंतर गेलें होतें करपून ॥
कुमार शंकरदेव तरुण तो खवळत होता आतून ॥
भाल्याच्या टोंकावर ज्यानें दख्खन सारी खेळविली ॥

तरवारीच्या धारेखालीं परजनसेना कापविली ॥
ज्यानीं ज्यांनी देवगिरीचा हृदयीं चिंतियला घात ॥
त्यांच्या हृदयाशींच घातला ज्यानें खड्गाचा हात ॥
मोठे मोठे युद्धधुरंधर समरीं ज्यानें लोळविले ॥
अशा प्रबल त्या सम्राटाला दिन उलटे भारी आले ॥
तरीहि ज्या ज्या रणशूरानीं रक्त आपुलें वाहविलें ॥
त्यांचा त्याला विसर न पडला बोलावुनि त्या गौरविलें ॥
त्यांतच होता विप्रकुलोत्तम नांव जयाचें मनोहर ॥
" हर ! हर ! ह्मणता तुटून पडला होता युद्धीं घनघोर ॥
बहुमानाचीं वस्त्रें देउन भूषित केला रायानें ॥
कष्टी झाला होता जरिही निजविजयश्री गेल्यानें ॥
तरुण देखणी मूर्ति मनोहर मनोहराची मनीं भरे ॥
" योग्यचि असतें राजजनाच्या प्रीतीला नररत्न खरें " ॥

※ ( २ ) ※

युवराजाशीं मैत्री जुळली तरुण आवडे त्यालाही ॥
गुणवंतावर सर्वजनाच्या प्रेमाचा सद्रस वाही ॥
त्या दोघांच्या ठायीं होता अंगभूत गुण शौर्याचा ॥
" समान गुण असल्या वांचूनी स्नेह न होई प्रीतीचा " ॥
सहवासाची गोष्ट निराळी; सद्गुण प्रेमातें जोडी ॥
प्रेम सद्गुणाची न फोडिता येइल कोणाला जोडी ॥
सन्निध असुनी ठाउक नव्हता जो बहुताना गुणवंत ॥
तो सकलाचा 'प्रेमी' बनला ह्मणती त्याला या परी ॥
त्यालाही या जगतीं नव्हता कोणाचाही आधार ॥

" निराश्रितांचा देव दयाळू वाहे डोईवर भार " ॥
जननी गेली जनकहि गेला अनाथ झाला जो बाळ ॥
ऋणानुबंधी कोणी होता केला त्यानें प्रतिपाळ ॥
कुठें तरी चाकरी धरूनी नांव आपुलें काढावें ॥
देवगिरीच्या साम्राज्याची सेवा केली निजभावें ॥
दु:खामागुनी सौख्य येतसे रजनी मागुन दिवस जसा ॥
ग्रीष्मामागुन वर्षा येई चाले क्रम हा नित्य असा ॥
गळोनि गेलीं पानें ज्याचीं त्याना नवपल्लव फुटती ॥
वसंतकाळीं तरु लतिकाना बहार पुष्पाचे येती ॥
एकस्थिति सारखी न राहे स्थित्यंतर चाललें असे ॥
बालपणीं सोशिले जयानें कष्ट; पुढें तो सुखी दिसे ॥
अधिकाराच्या उच्चपदावर नेमणूक पुढतीं होई ॥
भाग्यशशीच्या कला प्रतिदिनीं वाढत होत्या सुखदायी ॥
अधिकाराचा शिवला नाहीं परंतु खोटा अभिमान ॥
" समविषम स्थिति येवो कैशी शील न सोडी कुलवान " ॥

* ( ३ ) *

शरत्काल पातला फलवती झाली सुंदर वसुंधरा ॥
पर्वतराजींतून वाहती निर्मल पाण्याच्या धारा ॥
कणसानीं भरलेलीं शेतें डोलत होती वाऱ्यांनी ॥
पक्षीगणांना उडावित होते शेत करी ललकाऱ्यानीं ॥
वहात होत्या सरिता खळ खळ मार्गी वळणा वळणाने ॥
त्यांच्या काठावर तरु लवती फलपुष्पाच्या भारानें ॥
ऐशा वेळी मृगयेसाठी मित्र निघाले ते तरुण ॥

पुरललनांचीं चित्तें नेलीं मार्गीं ज्यानीं चोरून ॥
ऐकोनी चाहूल तयांची कुरंग पळती घाबरुनी ॥
हिंस्त्र पशु जेथल्या तिथें ते दडले पर्वत दऱ्यांतुनी ॥
शोधशोधुना त्यास काढिता झाला मोठा आकांत ॥
गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांची गडबड होई ती शांत ॥
शिकार जाते, हां हा ह्मणता घोडा सुटला बेफाम ॥
मनोहराला चुरस लागली झाला अगदीं बेभान ॥
आंगातूनी धारा फुटल्या, सुटला कमरेचा शेला ॥
शिकार गेली निघुन हातची उभा राहिला थकलेला ॥
सभोंवतालीं बघता दिसलें निर्जन कानन सर्वत्र ॥
परिजन कोठें, आपण कोठें, कोठें सहकारी मित्र ॥
विषम परिस्थिति ही भाविसुखाची जननी आहे खरोखर ॥
"अगम्य लीला दयानिधीच्या कोणा कळती अगोदर" ॥

* ( ४ ) *

अस्तगिरीच्या शिखरामागें झुकला दिवसाचा स्वामी ॥
उडत पाखरें वेगें येती उत्सुकतेनें निजधामीं ॥
पृथ्वीवरचें रश्मिजाल रवि आवरुनी घे माघारीं ॥
वृक्षांच्या शेंड्यावर चाले पक्ष्यांची गजबज भारी ॥
झळकत होता रंग ढगांचा पश्चिम भागी सोनेरी ॥
तो जाऊनी पडू लागली कांहीं थोडी अंधारी ॥
काय करावें विचार पडला निघावया न दिसे वाट ।
अधुकता ती लवकर आली झाडी होती घनदाट ॥
शोधित असतां दैव त्याच्या पायवाट दृष्टिला पडे ॥

ह्मणेः—" आंधळ्याची ही काठी नेवो आतां कणीकडे" ॥
रंग चढावला, स्वार जाहला, पाय काढिला तेथून ॥
चतुर शाहणा तुरंग चाले बघून वाटेची खूण ॥
बिकट वाट संपली, मनोहर उघड्या मार्गावर आला ॥
कळे न त्याचें त्याला आपण जातों कोण्या गावाला ॥
आकाशश्री खलूं लागली बघता पश्चिम दिशेकडे ॥
असा कोण ज्या निसर्ग पाहुनि चिंतेचा ना विसर पडे ॥
संध्येच्या दाराशी तारा घेउन पाहे लाजून ॥
कोण जिवाचा जिवलग तीचा कुणास टाकी मोहून ॥
एक एक ह्मणतांना जमल्या लक्ष तारका गगनांत ॥
एक चंद्र हा; चंद्र असे कीं मथुरेचा गोपीनाथ ॥
गगनसागरा भरती घेउन रत्नें वरतीं कीं आलीं ॥
कीं देवांचें कोश उघडलें आकाशीं या निशिकालीं ॥
कल्पतरूची फुलें उडालीं वाऱ्यानें गंगेवरचीं ॥
निशा संपुनी उजाडतांना जीं सुकून अगदीं जायाचीं ॥
सुरललनाचा मेळा जमला आहे कां स्नानासाठीं ॥
पर्व कोणतें येई असलें झाली तरुणींची दाटी ॥
कीं तारापति उदय गिरीवर विराजला जो त्याच्याशीं ॥
प्रणयाच्या गुज गोष्टि कराया आल्या ललना आकाशीं ॥
धमल चन्द्रमा कांति भूवरी वितरे अपुली धवलतरा ॥
दुग्धाचा कीं पूर लोटला त्यांत बुडाली वसुधरा ॥
शुभ्र वसन नेसुनी चन्द्रिका भेटत आहे रजनीला ॥
शशांक अथवा टाकुनि शेला निजवित आहे धरणीला ॥

* ( ५ ) *

घोडा थबके स्वार दचकला पाहे दृष्टी वळवून ॥
नशीब होतें थोर शिकंदर सावज गेलें जवळून ॥
खोल वाट त्या पुढची लागे वेलींच्या जाळ्यांमधली ॥
अडला घोडा काहीं केल्या पाय न अपुला तो उचली ॥
' मोती मोती ' ह्मणून थकला त्यास उतरणें भाग पडे ॥
" विपत्तिच्या शाळेंत गिरविती धैर्याचे रणशूर धडे ॥ "
जातां पुढतीं प्रकाश दिसला श्वानाचा शब्दहि आला ॥
शेतांमधल्या रखवालांचा ध्वनीहि येई कानाला ॥
येथवरी जी मुग्धा होती सृष्टि सती ती गुणगुणली ॥
शून्यवृत्तिच्या अंतःकरणी आशेची लहरी आली ॥
धीर मनाला आला खालीं जीव एकदांचा पडला ॥
गांव जवळ आला हें पाहून घोड्यावरतीं तो चढला ॥
ह्मणे मनीं तो ' दीनदयाळा ! सुटलों केली कृपा तुवां ॥
संकटकाळीं भक्त जनांना सरक्षाया तूच हवा ॥ '

* ( ६ ) *

त्या गांवाचें नाव न ठावें आला वेशिजवळ तरी ॥
गेले सारे घाबरूनियां वेशीवरचे वेसकरी ॥
" कोण तुह्मी रे वेसकरी का नाव काय या गावाचें ॥
आतांशीं कां झोंप घेतसां काय तुह्मी या कामाचे ॥ "
" माफ करा आताच झोंपलों होतों आह्मी सरकार ॥
हात जोडतो पाया पडतों आतां नाहीं चुकणार ॥
या गावाला ह्मनत्याती जी देसमुखाचें बुधगाव ॥

मायबाप तो या गांवाचा नाव असे माधोराव ॥
पिन्या उठरे! राम्या जारे बसला लेका काय [illegible] ॥
पाटिल बोवा घरींच असातिल, " राम्या जा जा तू [illegible] ॥
धांदल त्यांची अशी बघोनि आलें त्याला हसू जरा ॥
लगबग आले पाटिल तोंची लवून करिती ते मुजरा ।
दोघे गेले देशमुखांच्या घरीं सूचना देऊन ॥
त्यांना कळतां सामोरे ते आले पायीं चालून ॥
मनोहरानें ओळख अपुली करून दिधली रावांना ॥
नांव तयाचें ऐकुन मोठा विस्मय वाटे सर्वांना ॥
ऐकत होतों आजवरी सत्कीर्ती ज्याची लोकात ।
ज्याला ह्मणती देवगिरीचा आहे उजवा हा हात ॥
तोच पाहुणा गेहीं यावा, हा सारा योगायोग ।
माधवरावा मोद वाटला, वदले विनयानें योग्य ॥
" चाकर मी आपुला असे; " हा पिंड आपुल्या [illegible]
देवगिरीची सेवा करिता प्राण शेवटी जायाचा ॥
भाजी भाकर गोड करावी यावा इतुका मान मला ।
काय युवक बोलेल पुढें; जो विनयाने अगदी लवला ॥

* ( ७ ) *

देशमुखाची इभ्रत मोठी थोर घराणें कुलशील ॥
एकच कन्या पोटीं होति 'लीला' नामे सच्छील ॥
गिरिराजाची गौरी अथवा जनकाची जानकी जशी ॥
कण्वमुनीची शकुंतला कीं द्रुपदाची द्रौपदी जशी ॥
शुक्रगुरूची देवयानि कीं अश्वपतीची सावित्री ॥

भीमक भूपालाची कन्या रूपवती वा दमयती ॥
पयोधराची बिजली किंवा वसंतऋतुची कोकीला ।
चंद्राची चंद्रिका तशी ती रावाची होती बाला ॥
उद्यानातिल एक केतकी, फुलबागेतिल सदाफुली ॥
अजुनि न विकाशित झाली ऐशी गंध फलीची रम्य कळी ॥
बागेमधली पुष्करिणी वा झाडी मधली निर्झरिणी ॥
आर्यावर्तातील जान्हवी शोभे तैसी ती तरुणी ॥
पिता असो तो परि सकलांची ती होती जीवप्राण ॥
" कोणाला नावडते सांगा सद्गुण रत्नांची खाण ॥ "

* ( ८ ) *

बाल्य सपुनी मुग्धा आली तारुण्याच्या दाराशी ॥
मिळेल कैसा वर कन्येला, चिंता जननी जनकाशीं ॥
कोठे फुगला हुंडा, कोठे जन्मपत्रिका ती नडली ॥
कोठें आलें गोत्र आडवें, प्रवराची अडचण पडली ॥
सुधारणा त्या वेळीं नव्हती, गोष्ट असे ही पूर्वीची ॥
" प्राणाहि गेला तरी न तुटती धर्मबंधनें आर्यांचीं ॥
विद्या आहे तर तें नाहीं सत्तेचें घर रहावया ॥
विद्या धन वय बन्याच असती गोष्टि वराच्या पहावया ॥
कसा पोटचा गोळा तोडुन भलत्याहातीं तो द्यावा ॥
ठावा ज्याचा त्याला अनुभव इतरांना कैसा यावा ॥
तिलाहि होती कळली चिंता अपुल्या माता पितरांची ।
काय करावें तिनें तरीही, गोष्ट तिच्या का हाताची ?॥

* ( ९ ) *

मनोहराला तळमळ लागे जाण्याची परतून घरा ॥
रहा आणखी दोन चार दिन आग्रह चाले परोपरी ॥
किती करावें, वाटत होतें रावाना आतिथ्य तरी ॥
-“ प्रेमाच्या जाळ्यात गुतले मोठे मोठे अधिकारी ”
दोन दिवस जाहले तरीही पाय निघेना तेथून ॥
तया वाटले; कोणी अपुले चित्त नेतसे चोरून ॥
शिवले नसती विचार कधिंहि ते उठती अंत:करणी ॥
व्यर्थ जाहले यत्न तयाचे निज चित्ताच्या संयमनीं ॥
नकळत कोणा चोरून बघती डोळे एका मूर्तीला ॥
होय दृष्टिचें मीलन तेव्हा वळवुन घेई नयनांला ॥
प्रेमिजनाचीं चित्तें होता प्रथम परस्पर अनुरक्त ॥
मुग्धमनींचे हेतु वदाया असती दोघे असमर्थ ॥ ”
इंद्रधनुष्यामधले येती भिन्न रंग ना दाखवितां ॥
विकार सूक्ष्म प्रणयाचेही येतच नसती ते वदता ॥
पय:सागरावरी सारख्या लहरीवर लहरी येती ॥
वायूनें वृक्षांचे पल्लव क्षणोक्षणीं चंचल होती ॥
मनोहराची तशी जाहली स्थिति, मृगनयना पाहून ॥
ओढित होता चित्त बळानें, जातच होतें वाहून ॥
भोजन समयीं राव ह्मणाले ‘ अमुची लीला गृहदक्ष ” ॥
पंत बोलले होय खरं का?’ स्मितमुखी दिसली प्रत्यक्ष ॥
कसें हिला स्थळ मिळेल याची मन चिंता वाही प्रबळ ’” ॥
खडा टाकुनी ठाव घेतला, पाणी आहे कां उथळ ॥

वृद्ध माणसें फार घोरणी; वदती ऐसें तें साच ॥
नोहरानें ठाव न दिधला, विषय लाविला दुसराच ॥
या युवकाला जेवण रुचलें नाहीं काहीं त्या दिवशी ॥
द्यावा आता निरोप " ह्मणुनी निकड लाविली रावांशीं "
येईन लवकर पुन्हा एकदां खरेंच आतां जाऊं द्या ॥
असें बोलता राव ह्मणाले " रहा आज हो ! जाल उद्यां " ॥

* ( १० ) *

उषा फाकली किलबिल झाली झाडावरच्या खोप्यांत ।
देवमंदिरांतील चौघडा झडूं लागला तालात ॥
आजीबाई मंजुळ गाई भूपाळी श्रीकृष्णाची ॥
कितीशी वाटे फिरुनी तृप्ति न होई कर्णाची ॥
शीतकालचा समय असे तो वाजे भारी दातखिळी ॥
प्रातःस्नानें करीत होते भाविक तरिही शीतजलीं ॥
कमरेवरती घागर, कळशी दुसऱ्या हातीं तोलून ॥
परत येई द्विजांगना कुणि गंगेच्या पाण्याहून ॥
उजाडलें जाहली तयारी मनोहराच्या निघण्याची ॥
घरांत जाई बाहिर येई तळमळ वाटे लीलेची ॥
दर खोउनी सडा घातला दारा पुढतीं बालेनें ॥
आज लवकरी सपुन जाई आज संपला वेळेने ॥
घोड्यावरती जीन चढविलें दारा पुढतीं आणून ॥
गवाक्षिका काढी लीला मान खालती घालून ।
मान वळवुनी हळूच पाही चुकून जाई रांगोळी ॥
लक्षच नाहीं ज्या कामी हो ! त्याची होत रांगोळी " ॥

कुरळ केस सारतां, पदर सांवरतां वरचा क्षणोक्षणी ॥
नीलकांतिचे किरण त्यावरी सोडित होती सुलक्षणी ॥
त्या कांतिनें दिपून जाई सुचे न कांहीं लवलाही ॥
पाय न वाही जाण्याला जरि सूर्योदय तेथें होई ॥
कसातरी तो स्वार निघाला निरोप घेई प्रेमांत ॥
जातां जातां वळून बघता कटाक्ष शिरला हृदयांत ॥
तरवारीचा घाव मिटाया उपाय ये कांहीं करिता ॥
जखम जाहली जी हृदयाला ती येइल कां दाखविता ॥ ११०

* ( ११ ) *

सकाळची ती वेळा, कोमल किरणें पडलीं सूर्याची ॥
गांवापेक्षां शेतामध्यें मौज खरी ती बघण्याची ॥
गुरें निघालीं चरण्यासाठीं धेनु वासरें हंबरती ॥
धनी गुराखी मन रमवाया मंजुळ पावे वाजविति ॥
शेतकरी आगटी करूनी भाजुन कणसें त्या वरती ॥
बसून शेताच्या विहरीवर ताजा हुरडा ते खाती ॥
फळझांडावर चढुन वानरें यथेच्छ खाती गोड फळें ॥
आला मागुनि शेतकरी हें पाहुन त्याची झुंड पळे ॥
सभोंवतालीं नवसृष्टीची गजबज चाले अशा परी ॥
नेत्र असोनी मनोहराला नव्हतें कांहीं दिसत परी ॥
मन मागें राहिलें, चालली तनु घोड्यावर मात्र पुढें ॥
"अन्य उपाय न कांहीं असती ह्मणती विरहव्यथेपुढें" ॥
दुपार झाली जीव गळाला खावेंसें परि वाटेना ॥
मनोहारिणी मनोहराच्या डोळ्यांपुढुनी हालेना ॥

यद्धृदयाची शांती गेली तो विश्रांति घेण्याला ।।
एका झाडाखालीं बसला पुसीत अपुल्या घामाला ।।
दृष्टिस पडला जल-निर्झर जो जवळच होता वाहात ।।
जाउन त्याशीं बोलत बसला विरहाच्या परिभाषेंत ।। ११९

※ ( १२ ) ※

ह्मणें:–" निर्झरा ! सांग गड्या ! का मिळशी चंपा सरितेला ।।
बुधगांवाच्या जवळ पावली जी गंगेच्या उपमेला ।।
तुला जाहली त्वरा वाटतें निज दयितेच्या भेटीची ।।
थांब जरा पण, ऐकून घेई खळबळ माझ्या हृदयाची ।।
जेथें होइल संगम तव बा ! तेथें घडला विरह मला ।।
मी विरही तू अनुरागी हा योग चमत्कारिक जमला ।।
कोण अशी ती मनःस्वामिनी हृदय हारिणी चंद्रकला ।।
कशास सांगूं इतर खुणा त्या खूण सांगतों एक तुला ।।
संगम तीरी स्नाना साठीं मिळून येती कुमारिका ।।
त्यांत विरहिणी दिसेल, अर्धस्फुट जाईची जणुं कलिका ।।
तीच जाण मम हृदयदेवता ओळख तिजला दे आधीं ।।
नको मनीं तू शंकित होऊं, नाहीं ती संशयवादी ।।
सांग तिला:–" अव्यक्त प्रेमें काल मोहिलें तूं ज्याला ।।
जातां जाता तुज सांगाया निरोप वदला तो मजला ।।
तुझी ऐकतां कर्ण मनोहर अर्थपरिप्लुत रसवती ।।
सोत्सुक येउन बसेल जवळी रूपगुणांची सेवती ।।
शब्द मुखाचे हेच सांग कीं:–" प्रीति अर्पिली जी मजला" ।।
ती दासावर तव अनुरक्ती, हृदय अर्पिलें मी तुजला ।।

बोलु शकलों नाहीं दोघें, गांठ न सुटली प्रीतिची ॥
अंतींचा त्वत्कटाक्ष माझ्या जाउन भिडला हृदयाशी ॥
असेल कांही पूर्वार्जित तरि पडतिल जन्माच्या गाठी ॥
आज परतू झाल्या असती उभयांच्या ताटातूटी ॥
दुर्दैवानें विफल हेतु जरि होतिल चित्तीं रचिलेले ॥
तुझें काय सांगूं, पण माझें आयु फुकट मग उरलेलें ॥
कशास पुढचे हाल सांगुनी दुखवूं कोमल हृदयाला ॥
मन मनुज्याचें चंचल असतें, शंका येती किति त्याला ॥
आग्रह केला पुन्हा यावया जनकानें पण येउं कसा ? ॥
घालूं कैशी मीच मागणी, प्रश्न राहतो उभा असा ॥
विधिघटना बलवत्तर असते योग आणिते जुळवून ॥
योगची नसता कार्य जुळेना मन कोणाचें वळवून ॥
कंठी दिन तोंवरी कसे तरी, टाकी दीर्घ न उच्छ्वास ॥
शुभशकुनें होतील तुला जीं त्यावर ठेवि विश्वास ॥
मला प्रथम तर शुभशकुनी हा निर्झर भेटे येतांना ॥
सुचवी कीं मत्सम होईल बा ! प्रिय संगम तव तप्तमना ॥
कितीकदा या शुभ शकुनांची अनुभवसिद्धी मज आली ॥
तुझ्या चिंतनीं ह्मणून कंठीं आशेची माळा घाली ॥

* ( १३ ) *

काय काय तुज सांगूं रुचिरा सांगवयाचे फार असे ॥
उशीर तुजला झाला, चळवळ देहाची तव होत असे ॥
नये विचारूं विचारतों परि; "राहिल ना हें ध्यानांत ? " ॥
विस्मृति तर पडणार नाहीं ना ? चंपेच्या संगीतांत ॥

जनक तुझा गिरिराज असे हा, जन्म जाहला थोर कुळी ॥
नको घ्यावया शंका; परि ही मनोवृत्ति झाली दुबळी ॥
स्फटिक शुद्ध जल साक्ष देतसे परोपकारी हृदयाची ॥
अंतःकरणें तोषविलीं किति जलदानें मार्गस्थाचीं ॥
निर्मल जल तें प्राशन करितों येतों आतां कृपा करी ॥
भेटीला आणणें पुन्हां बा ! आहे मित्रा ! तुझ्या करीं ॥
निघून गेला विरही प्राणी निर्झर वाहे सदापरी ॥
काय ह्मणावें या बोलाला ‘ कामी वृत्ती विकल खरी ’ ॥

* ( १४ ) *

आले आले पंत मनोहर वार्ता गेली गडावरी ॥
घेत घेत लोकांचे मुजरे चाले पंताची स्वारी ॥
शंकरदेव स्वता तयांना समोर येताना दिसले ॥
पाहुन दोघे परस्पराना सस्मित झालेले दिसले ॥
जवळ जाउनी पतांनीं निजशिर नमवुनि वंदन केलें ॥
युवराजानीं समभावानें मधेंच उचलुन त्यां धरिलें ॥
पूज्य रामराजाच्या दर्शनिं बोलत चालत ते गेले ॥
राजनिष्ठ पंतांचें मस्तक सदय नृपाच्या पदिं ठेलें ॥
प्रीति रामराजाची दिसली आशीर्वादाच्या शब्दीं ॥
“ चिरंजीव हो बाळा ! कर या राष्ट्राची वैभव वृद्धी ” ॥
बुधगावाचा निरोप याया तीन दिवस की होतील ॥
त्याच्यापूर्वी तुझा मित्र हा शंकर तुटला तिळतीळ ॥
कसें करमलें अह्मा सोडुनी तेथें तुजला मनोहरा ॥
कां पूर्वीची ओळख होती, ? कळुंदे आह्मालाहि जरा

ह्यात जोडुनी मनोहराने संकट वार्ता निवेदिली ॥
देशमुखांची कीर्ति गाइली; मुख्य गोष्ट ती लोपविली ॥

* ( १५ ) *

राजाचे स्त्रवले बोधामृत.–" साहस भलतें करू नये " ॥
मृगया व्यसन न फार चांगलें, काळवेळ कां सांगुन ये ॥
इरेस पेटुनि भलत्या कामा शिर हातावरि कां घ्यावें ॥
तुह्मास सारें कळतें तेव्हा मीच कशाला सांगावें ॥
राजकारणें कितीक पडली तिकडे अपुले चित्त वहा ॥
परवशतेच्या धुळींत मरला स्वतन्त्रतेचा ध्वज पाहा ॥
शूर छातिच्या बहादरांनो घ्याका शत्रु समाचार ॥
ते राहुनी काय करितसा वन्य पशूचा संहार ॥
तुमची झाली शिकार तरिहो शिकार कोणाची करितां ॥
स्वतंत्रतेला आग लागली पहात त्याला का बसता ? ॥
वैभवाशिखरा वरचा ढळला कळस लोळला भूमि-तळीं ॥
शुभ्र यशाला डाग लागला, येते रक्ताला उसळी ॥
कीर्ति सुंदरी मलूल झाली, विजय भामिनीही रुसली ॥
साम्राज्यश्री भिजवित बसली गाल आपुले अश्रुजलीं ॥
रणदेवीच्या प्रिय भक्तांनो उपासकांनो व्हा गोळा ॥
शौर्य तपाने त्यास आळवा त्याच्या मांडीवर लोळा ॥
माझें आता काय राहिलें, दुपारची छाया ढळली ॥
आयुष्याचा सूर्य उतरला, शक्तीची संध्या झाली ॥
डोळे मिटण्या पूर्वि बघावें उज्ज्वल मुख या देशाचें ॥
अस्तगिरीचा सूर्य पाहातो जैसे मुख निज पद्माचे ॥

माझी आशा सफल कराया आहे तुमचा आधार ।
नैराश्याची माझ्या नयनीं लावुं नका अश्रुधार ॥
लक्ष असे ना शंकरदेवा ! माझ्या या बोलण्याकडे ॥
मनोहरा ! का डोळे पुसशी येई थोडा जवळ पुढे ।

## ❊ ( १६ ) ❊

पाठीवरतीं हात फिरविला; लागे नेत्रांना गळती ॥
" प्रेमाच्या सागरांत मोठे धैर्य मेरुही विरघळती " ॥
" दो हाताचे चार हात तव माझ्या देखत होतील ॥
तुला पाहुनी सुखात पंचप्राण विसावा घेतील ॥
मातापितरे गेलो स्वर्गी उघडा तेव्हां पासून ॥
केव्हा मी पाहीन एकदां घरात आलेली सून ॥
नको नको हे अश्रू गाळूं, माझा तू असशी कर्ण ॥
त्या जलकावरि रहा विसवुनि भिन्न मात्र याचा वर्ण ॥
नको हुंदके [illegible] ॥
आले कोण बरे परतोनी स्वर्गाच्या दारावरचे ॥
जे गेले ते गेले तैसे उरलेलेही जायाचे ॥
आज उद्या जे जन्मा येतिल तेहि मागुनी यायाचे ॥
फूल विकसले, गळून पडले, सुकून गेलें तेंच पुन्हां ॥
विकसित झालेले लतिकेवर बघावया येईल कुणा ॥
काल दिवस जो गेला निघुनी तोच काय आजचा असे ॥
उद्यां दिवस आजचा न येई, गेलेला क्षण येत नसे ॥
फार कशाला इथेंच होते नांदत जे वैभवशाली ॥
जागृत कां होतील सांग ज्यां काळाची निद्रा आली ॥

जन्ममरण याहून वेगळा जो विश्वभर तो ध्यावा ॥
" ज्यानें त्यानें कर्तव्याचा मार्ग आपला शोधावा " ॥

* ( १७ ) *

त्या रात्रीं तर मनोहराला झोप कशी ती नच ठावी ॥
श्रमित जाहला होता तरिही धरणीला अंग न लावी ॥
अलंकार शोधीत बैसतो जैसा सत्कवि कवितेचा ॥
निश्चलतेनें विचार करितो योगी कीं जड जगताचा ॥
तटस्थ राहुनि ग्रहगति पाहे जैसा ज्योतिःशास्त्रज्ञ ॥
महातत्त्व संशोधन करिता निमग्न असतो तत्वज्ञ ॥
दुर्दैवी वा विरही किंवा दुःखी कष्टी जन जैसा ॥
निढळाला कर लावुन बसतो एकांतीं तैसा ॥
मागिल दुःखें पुढची चिंता मनस्ताप सद्यस्थितिचा ॥
कुरंग होता पळत मनाचा वेध लागला सर्वांचा ॥
क्षुब्ध सागरावरी असावें भटकत तारु कुठें तरी ॥
प्रभंजनानें मेघपंक्तिला कीं फिरवावें नभांतरीं ॥
वातावरणीं रज कणाची स्वैरगती दिसुनी यावी ॥
पुरांत सांपडलेलीं काष्टें वहात खालीं कीं जावीं ॥
स्थितींत ऐशा रात्र निघोनी गेली त्याच्या दुःखाची ॥
पापणीस पापणी न लागे कांही केल्या डोळ्याची ॥

* ( १८ ) *

यापरि गेले चार मास जणु वर्षें गेलीं चार तया ॥
वृक्ष लतांना बहार आला वसंत राजा ये उदया ॥
उडवित होता वायु फुलांचा पराग दाही दिशांतुनी ॥

भृंग जाहले गुंग पहा नवसुम मकरंदाच्या पानीं ॥
दिसूं लागला कोकिळ पक्षी आंब्याच्या शाखेवरुनी ॥
भरकन जाई भारद्वाजहि वेलीच्या गुंफ्या मधुनी ॥
कदंब तरुला अंकुर फुटले, लाली चढली पळसाला ॥
मोहोरानें आम्र-तरूची शोभा गेली कळसाला ॥
मंद मंद तटिनीचा वाहे प्रवाह एका काठानें ॥
सुकून गेले पात्र जियेचें प्रखर उन्हाच्या तापानें ॥
तिच्या तटावर वेलीं फुलुनी गळती पुष्पें जीं खालीं ॥
जलधारेनें वहात जाता अडती कांहीं शेवाळीं ॥
शून्यदृष्टि लावून मनोहर पहात होता वनराजी ॥
वेळ कसातरि काढित होता मुळींच नव्हतें मन राजी ॥
उंच बंगला त्याचा होता बुरुंजावरच्या माडीचा ॥
बुधगांवाचा मार्ग जेथुनी स्पष्ट दिसावा झाडीचा ॥
नेत्र लागती त्याच दिशेला दुसरी शोभा असूनही ॥
प्रसन्नतेचें नावहि नव्हते हुरहुर वाढे मात्र नवी ॥
जिनें मोहिलें हृदय तयाचें ती सौंदर्याची ज्योती ॥
बसली होती कां त्या मार्गी किंवा येणारी होती ? ॥
ध्यास लागला जिचा मनाला ती चालत का येणारी ? ॥
गूढ गूढ अत्यंत गूढ हे प्रणयाचे हेतू भारी ॥

※ ( १९ ) ※

त्याच बाजुनें गाडी आली वेगें शिरली झाडींत ॥
मनोहराला दिसला कोणी सभ्य बैसला गाडींत ॥
“ असतिल का ते बुधगावाचे देशमुख माधवराव ॥

जणो खोदिलें हृदयपटावर उदार चरिताचें नांव ॥
अप्रासंगिक कशास येतिल छे! माझी कल्पना चुके " ॥
दीर्घ उसासा एक टाकिला, निराशतेनें तोंड सुके ॥
उठला तेथुन फिरावयाला लागे पाउल मंद पडे ॥
तोंच पाहिला सेवक दुरुनी येइ जो आपणाकडे ॥
उभा राहुनि उत्कंठेनें अधीरतेनें त्यास बघे ॥
देशमूख आल्याची वर्दी ऐकुन तो तैसाच निघे ॥
विचार पहिले मावळुनीयां तोंडावर तेजी आली ॥
सेवक तर मागेंच राहिला पतांना लगबग झाली ॥
कृतज्ञतेची पवित्रता ती कीं प्रीतीची स्वतंत्रता ? ॥
आशेची का विकारवशता आतिथ्याची यथार्थता ॥
थोर मनाची शालिनता कीं श्रेष्ठ जनाची सुविधता ॥
काय नाव भावनेस द्यावें जिची दिसे मनीं उत्कटता ॥२००

* ( २० ) *

सर्व मडळी भिऊन गेली चौकीवर जी असणारी ॥
ऐन दुपारीं कुठें निघाली ह्मणती पंतांची स्वारी ॥
माधवरावा हर्ष वाटला अहा! ' स्वता आले पंत ' ॥
सस्मित वदले-" माझ्यासाठीं श्रम कां दारापर्यंत " ॥
हांसत त्यांना ' पत ' ह्मणाले-यांत कशाचे श्रम असती ॥
तुह्मास पाहुन होते माझ्या चित्ती प्रेमाची वसती ॥
बरें सर्वजन कुशल असतिना; अपुले क्षेमहि आहे ना? ॥
अन्तर्गूढ प्रश्न असा तो केल्यावांचुन राहेना ॥
जी उत्सुकता जी प्रेमळता त्यांचे पडदे सारून ॥

पहा पलिकडे कोण विराजे 'रति–लीला' दुसरी कोण ॥
भावि सुखाची मंजुल गंगा; स्वर्गातरची कल्पलता ॥
जीवित कासारातिल नलिनी, संसाराची प्रसन्नता ॥
हृदयाकाशांतील कौमुदी उज्वल शुक्राची तारा ॥
कविकुल गुरुची कविता देवी, शुभ्र सुधेची कीं धारा ॥
संतकवीची मंगल वाणी, मंगल तेजाची खाणी ॥
अंतश्चक्षूपुढें अशी तो लीलेची मूर्ती आणी ॥
बोलत गेले दोघे वरतीं पुढचा आदर पुसू नका ॥
राव मुखानें बोलत होते तृप्त होउनी 'नका नका' ॥२०९

## ※ ( २१ ) ※

काय बरें रावांचा हेतू गोत्र आपुलें कां पुसती ॥
मनोहराच्या मनोरथाची चक्रें काहीं स्थिर नसती ॥
अस्फुट ती माधवी लतेची कलिका चंद्राची कोर ॥
त्रस्त मनाला आज उद्यां कां सुख देणारी होणार ॥
मृदु पवनाने विकंपणारी भागिरथीची ती लहरी ॥
थोड्या वेळानें का आतां पावन मजला करणारी ? ॥
रम्य मंजिरी मंदाराची प्रीति–रसाला स्रवणारी ? ॥
कांही काळाने कां मजला भूषित आहे करणारी ? ॥
चिरपोषित वासना मनाच्या किंवा तृष्णा प्रीतीच्या ॥
आशा हेतू सर्व या पुढें सरतिल सदनी तृप्तीच्या ॥
उज्वल भावानें खचलेलें अनुरागानें द्रवलेलें ॥
असें हृदय येईल जवळ जणु अमृत रसानें भरलेलें ॥
त्या हृदयाची तार आपुल्या हृदयाला मी जुळवीन ॥

( पु. २१ )

सूर त्यांतुनि एक कौतुकी प्रेमगोलही हलवीन ॥
झाडाला हालवितांना त्या गुलाली उधळीन ॥
'प्रेम प्रेम' हा नाद चहूकडे दाहि दिशांना घुमवीन ॥
त्या नादानें स्वर्गस्थांचे आत्मे जागे होतील ॥
आशिर्लहरी वातावरणांतून खालतीं येतील ॥
त्या लहरींनीं नंदनवन हें संसाराचें डोलेल ॥
'आनंदीआनंद' चहुकडे जीवात्मा हा बोलेल ॥
संसाराची दिशा फांकली उजेड आता पडणार ॥
स्वप्न नाहिं ना? छे! दिवसाची रजनी कैशी होणार ॥
जाइल अवधी प्रभात होईल मंगल वेळा येईल ॥
आलि नलिनीच्या गांठी पडुनी मंगल मगल होईल ॥
अमरपुरीच्या सौंदर्यानें मंडित होइल गृह माझें ॥
निवास होइल त्या देवीचा नांव 'देवगिरि' मग साजे ॥
कितीक ऐसे विचार करिती मनांत त्याच्या कल्लोळ ॥
गेली होती खोल तयाच्या चित्ती आशेची ओल ॥ २२३

* ( २२ ) *

माधवरावांची विनती कीं लीलेला पदरीं घ्यावी ॥
मनोहराची मनोहारिणी झालेली ती पाहावी ॥
आश्रित मी तुमचा हें ओझें डोईवरचें उतरावें ॥
रामराय आश्रित कनवाळू अनुमोदन देई भावें ॥
तिथी योजिली, मुहूर्त ठरला ध्वजा तोरणें उभारिली ॥
देवगीरीची कित्येकांनीं स्वर्गाशीं तुलना केली ॥
रामदेव नृप व्याही, हें कां स्पष्ट पाहिजे सांगितलें ॥

अभीष्ट देवाजवळ तयांनी मनोहराचें मागितलें ॥
राजाच्या घरचेंच लग्न तें; थाट काय तो सांगावा ॥
थोर भाग्य त्यांचें कीं ज्यानीं सर्व पाहिला देखावा ॥
कोठें यादव साम्राज्याचा मालक, कोठें मनोहर ॥
धन्य ` रामराजाची ऐसा भूपति नाहीं होणार ॥
मूर्तिमंत लक्ष्मी अवतरली गृहलक्ष्मीतें आणाया ॥
काव्य निराळें एक पाहिजे यथातथ्यता वर्णाया ॥
मंगल वाद्यें वाजुं लागलीं तोफांच्या फैरी झडती ॥
शिंग, तुताऱ्या भेरी यांचे ध्वनि कानामध्यें घुमती ॥
वरात झाली सज्ज निघाया त्यावेळीं जातां जातां ॥
निंबलोण काढिते अहा! ती राष्ट्राची प्रेमळ माता ॥
गाड्या घोडे उंट साडणी गज रथ मोठाले मेणे ॥
वधून वाटे गांव चाललें बुधगावाच्या वाटेनें ॥
वऱ्हाड आलें जवळ पसरली वार्ता सगळ्या गांवांत ॥
सीमंतीचा विधि आटोपे मुख्य ग्राम–द्वारात ॥
वरात चाले गांवामधुनी स्त्रिया काढिती उद्गार ॥
तोच बाई ग ! मदन असे हा; लीला भाग्याची थोर ॥
मुहूर्त आला घटका भरली सावधान मंगल झालें ॥
आनंदाचा पूर लोटला वधुवर त्यामध्यें गढले ॥ २३६

* ( २३ ) *

तोच वसंत परंतु जयाला आरंभीं तापद गमला ॥
त्याला वाटे सुखवायाला आज खरा तो गहिंवरला ॥
फलभारांनीं नितांत लवली हिरवी आंब्याची झाडी ॥

गुंफ्यामध्यें बसुन कोकिळा सूर पचमाचा काढी ॥
अर्धे हिरवे अर्धे पिवळे ऐसे आंबे पाडाचे ॥
वारा लागुन गळून पडती काहीं त्यांतुन झाडाचे ॥
पक्ष्यांनीं टोंचिले जयांचा लाल भाग आंतून दिसे ॥
देंठ न अजुनी सुटला ह्मणुनि वर कांहीं डुलती ऐसे ॥
ऐशावेळी विलासिनी ती, जीतें ना अनुभव कांहीं ॥
प्रथम मीलनीं मुग्ध जाहली लाजोनि खालीं पाही ॥
क्षणभर दोघे कांहिं न वदले, मूकवृत्ति ती दोघांची ॥
परस्परांच्या मुखीं विलसली छाया गूढ विचारांची ॥
निजपदराचे ततू काढित होती पाहत ती खालीं ॥
'प्रिये! असा मधु शब्द ऐकुनी विलोल अभिरामा झाली' ॥
"वासंतिक हा समय सुखाचा शोभा दिसते कां याची" ॥
पहा! पलिकडे मधुप लतेच्या जवळ प्रीतीला याची ॥
करशाखांनीं आम्र बोलवी पहा कोकिळा रमणीला ॥
सहस्रकर दैदीप्यकरानीं विश्लथ करितो धरणीला ॥
वसंत घाली वनदेवीवर सुमपर्णान्वित हा शेला ॥
कोण प्रणयी धारण न करी सांग प्रणयिनि आशेला? ॥
मधु स्मिताची छटा झळकली लाली गालावर आली ॥
शुभ्र जलाची मौक्तिक माला अलकावतिच्या ये भालीं ॥
ह्मणे पुढें तो:—"पाय तुझे हे दुखत नाहिं का सुकुमारे?" ॥
करस्पर्श होतांची झालें शरीर रोमांचित सारें ॥
वसंत तो प्रत्यक्ष, कशी मग मुग्ध कोकिळा राहे ती ॥
तिच्या प्रीतिला वाचा फुटली शब्द न ते ऐकूं येती ॥ २४९

* ( २४ ) *

त्या दोघांना प्रीतीवांचून भाषा दुसरी येत नसे ॥
येती दुसरी वाक्यें तरिही अर्थ तयांचा एक असे ॥
जो दिन गेला हर्षभराचा तैसा पुढचा भासनसे ॥
सदा असावें जवळ, न जावें दूर असें त्या वाटतसे ॥
हळू हळू आनंद-गिरिवर चढून गेले ते ऐसे ॥
उभारिलें मंदीर सुखाचें तयांत जोडी ती विलसे ॥
कधीं हास्यमय विषय निघावा, विनोद केव्हां चालावा ॥
केव्हांही पण पहा तियेनें विनय न अपुला सोडावा ॥
अनुपम सुख जें स्वर्गावरचें तेंच असावें हें काय ॥
अशी कितिकदा विलासिनीला शंका येउनीया जाय ॥
कल्पतरूची गोड फळें कीं सुधारसाचें माधुर्य ॥
यांशीं केले त्यांनीं अपुल्या सौख्याचें तुलना कार्य ॥
रात्र सपुनी दिवस उजाडे तोहि जाउनी ये रजनी ॥
रविपृथ्वीसम परस्परांवरि लुब्ध जाहले दिनरजनीं ॥
अशीं निघोनी गेलीं वर्षें तीन न कळली तथा परी ॥
" ऐन सुखाच्या भरांत कोणी काळाची गणना न करी " ॥
२५७

* ( २५ ) *

एकच सृष्टि परतु तेथें क्रांती होते नितकाळीं ॥
एकच मुरली परंतु नाना सूर काढितो वनमाली ॥
उषा-हांसरी खेळुन जातां संध्या येते रुसलेली ।
भरती येउन जातां मागुन ओहोटी ती ठरलेली ॥
नील नभाला नक्षत्रांनीं सौंदर्याचा ये पूर ॥

कृष्ण ढगांनी स्वरूप त्याचें दिसू लागतें भेसूर ॥
शुक्लाचें चांदणें संपुनी कृष्ण तिमिर वाढत जाई ॥
कला जाउनी क्षीण विधूचें बिंब नभीं निष्प्रभ होई ॥
देवगिरीच्या साम्राज्याचा तसा खालती रवि येई ॥
ढळून छाया दुपारची ती क्षितिजाशीं वाढत जाई ॥
मृत्युशयनिं हा कोण पहुडला वृद्ध भीष्म इच्छा मरणी ॥
रामदेव राजेश्वर तो हा; मावळतो हा! हा! तरणी ॥
ज्यानें समरांगणीं निजविले कित्येकांना तो गाजी ॥
स्वतः पहुडला अंतकाळची झोंप घ्यावयाला आजी ॥
अरिललनाच्या लोचनांतुनी काढी अश्रूंचे पाट ॥
तद्रमणीच्या शोकाच्या सागरा नसे आजी वाट ॥
आर्य भिषग्वर राजवैद्यही चिंतामणि मात्रा देती ॥
जरि येती आश्विनीकुमारहि आयु कसे ते वाढविती ॥

* ( २६ ) *

मोठ्या कष्टें शब्द निघाले ये जवळी शंकर बाळा ॥
मनोहरा! ये तूही इकडे सन्निध आली मम वेळा ॥
एक हात तत्कंठीं घालुनि वदला वाणी दुःखभरें ॥
झाली नाही पूर्ण अशी मम अंतीं आशा एक उरे ॥
पारतन्त्र्य-पंकातुनि माझा आवडता हा देवगिरी ॥
उद्धरलेला नाही दिसला अंतर कासावीस करी ॥
पुरवा माझी इतुकी आशा बंधूसम वागा दोघे ॥
मनोहराचा हात शंकरा! देतों तो हा हातीं घे ॥

* ( २४ ) *

त्या दोघांना प्रीतीवांचून भाषा दुसरी येत नसे ॥
येती दुसरी वाक्यें तरिही अर्थ तयाचा एक असे ॥
जो दिन गेला हर्षभराचा तैसा पुढचा भासनसे ॥
सदा असावें जवळ, न जावें दूर असें त्या वाटतसे ॥
हळू हळू आनंद-गिरिवर चढून गेले ते ऐसे ॥
उभारिलें मंदीर सुखाचें तयांत जोडी ती विलसे ॥
कधीं हास्यमय विषय निघावा, विनोद केव्हां चालावा ॥
केव्हांही पण पहा तियेनें विनय न अपुला सोडावा ॥
अनुपम सुख जें स्वर्गावरचें तेंच असावें हे काय ॥
अशी कितिकदां विलासिनीला शंका येउनीया जाय ॥
कल्पतरूची गोड फळें कीं सुधारसाचें माधुर्य ॥
यांशीं केलें त्यांनी अपुल्या सौख्याचें तुलना कार्य ॥
रात्र सपुनी दिवस उजाडे तोहि जाउनी ये रजनी ॥
रविपृथ्वीसम परस्परांवरि लुब्ध जाहले दिनरजनीं ॥
अशीं निघोनी गेलीं वर्षें तीन न कळलीं तया परी ॥
"ऐन सुखाच्या भरात कोणी काळाची गणना न करी" ॥

२५७

* ( २५ ) *

एकच सृष्टि परतु तेथें क्रांती होते नितकाळी ॥
एकच मुरली परंतु नाना सूर काढितो वनमाली ॥
उषा-हासरी खेळुन जातां सध्या येते रुसलेली ॥
भरती येउन जातां मागुन ओहोटी ती ठरलेली ॥
नील नभाला नक्षत्रांनीं सौंदर्याचा ये पूर ॥

कृष्ण ढगांनी स्वरूप त्याचें दिसूं लागतें भेसूर ॥
शुक्लाचें चांदणें संपुनी कृष्ण तिमिर वाढत जाई ॥
कला जाउनी क्षीण विधूचे बिंब नभीं निष्प्रभ होई ॥
देवागिरीच्या साम्राज्याचा तसा खालतीं रवि येई ॥
ढळून छाया दुपारची ती क्षितिजाशीं वाढत जाई ॥
मृत्युशयनिं हा कोण पहुडला वृद्ध भीष्म इच्छा मरणी ॥
रामदेव राजेश्वर तो हा; मावळतो हा! हा! तरणी ॥
ज्यानें समरांगणीं निजविलें कित्येकांना तो गाजी ॥
स्वतः पहुडला अंतकाळची झोंप घ्यावयाला आजी ॥
अरिललनाच्या लोचनातुनी काढी अश्रूंचे पाट ॥
तद्रमणीच्या शोकाच्या सागरा नसे आजी वाट ॥
आर्य भिषग्वर राजवैद्यही चिंतामणि मात्रा देती ॥
जरि येती आश्विनीकुमारहि आयु कसे ते वाढविती ॥

* ( २६ ) *

मोठ्या कष्टें शब्द निघाले ये जवळी शंकर बाळा ॥
मनोहरा! ये तूंही इकडे सन्निध आली मम वेळा ॥
एक हात तत्कंठीं घालुनि वदला वाणी दुःखभरें ॥
झाली नाहीं पूर्ण अशी मम अंती आशा एक उरे ॥
पारतंत्र्य-पंकांतुनि माझा आवडता हा देवगिरी ॥
उद्धरलेला नाहीं दिसला अंतर कासावीस करी ॥
पुरवा माझी इतुकी आशा बंधूसम वागा दोघे ॥
मनोहराचा हात शंकरा! देतों तो हा हातीं घे ॥

सुंदर तुमचे गोड चेहरे नसती आता दिसत मला ॥
उठा! उठा! आणा गंगाजल, जीव बावरा हा झाला ॥
डोळे थिजले, कंठ दाटला 'घर घर' चाले मोठ्यानें ॥
एका व्यक्तीसह बोलाया प्रयत्न केला कष्टानें ॥
का..ते ये..तों अरे! को ण हे, थांबा थो..डें बो लूं.द्या ॥
शं..कर! श.क.र रा.म रा. म....रा..........॥

* ( २७ ) *

प्रजादयेचा वृक्ष उमळला; साधु कृपासागर सुकला ॥
दिव्ययशाचा तारा तुटला, धैर्याचा गिरि कोसळला ॥
शांतिप्रद कीं चंद्र बुडाला; तेजस्वी रवि मावळला ॥
नृप माळेंतिल हिरा गळाला, कल्पवृक्ष वाळुन गेला ॥
भूतदया पोरकी जाहली, वत्सलता उघडी पडली ॥
हात लावुनी निज भालाला राजनीति ढळढळ रडली ॥
रामराज्य कलियुगांत होउन गेलें, झालें आश्चर्य ॥
"धन्य! धन्य कवि गाई ज्याच्या नामयशाचें माधुर्य" ॥
दीनांचा कैवारी तैसा दुष्ट जनाचा जो वैरी ॥
जो पाप्यांना शिक्षाकारी, त्यावर काळाची स्वारी!
सुवर्ण सिंहासनावरी जो राजमंडलीं शोभावा ॥
स्मशानात तो काष्ठ चितेवर हा! हा! कैसा झोंपावा ॥
अराजकांच्या मनीं उपजवी चिंताग्नीची जो ज्वाला ॥
हर! हर! कैसा अग्नि लागला त्या राजाच्या देहाला ॥
दुःखाची किंकाळी उठली शोकाची तटिनी भरली ॥

बुद्धीची ती नौका फुटली शांतीची भाषा कुठली ॥
उदार असला कर्ण हरपला, शांतात्मा गेला धर्म ॥
प्रजाजनाचें पुण्य संपले, वांट ओढवलें कर्म ॥

※ ( २८ ) ※

काळ उभा राहिना कुणाची व्याकूल स्थिति पाहात ॥
आला पुढती 'श्रीशंकर जय' ललकारी तो ठोकीत ॥
पंकेरुह नाशिले समीरें नवीन विलसे त्याजागी ॥
तारा तुटला एक भूवरी दुसरा ये अंबरभागीं ॥
क्षितिजावरि बालार्क विराजे तैसा श्रीशंकरदेव ॥
राज्याधिष्ठित झाला, वाटे प्रजाजनांना भूदेव ॥
मनोहराला प्रधान ह्मणुनी उजव्या हाताशीं केला ॥
भार वहाया उभा राहिला तोही कंबर कसलेला ॥
रायाच्या बाणीचा त्यांच्या बाण लागला हृदयाला ॥
देशभक्त लागले उभयता राष्ट्रोन्नतिच्या मार्गाला ॥
स्वभाव मोठा उतावळा स्वच्छंदी शंकरदेवाचा ॥
"राजकारणी पुरुष मनाचा लहरी नाही कामाचा" ॥
दिल्लीची खंडणी तयानें हेतुपुरःसर थांपविली ॥
प्रबल रिपुची देवगिरीवर अफाट सेना बोलविली ॥
आधी जमवूं घडी बरोबर, बांधूं हे किल्लेकोट ॥
हल्ल्यावर मग हल्ले चढवुनि पुरवूं शत्रूची पाठ ' ॥
मनोहराचा बोध न रुचला, औषध जसें रुग्णाला ॥
वाटत होतें त्यास मनी की ' वेळ नको कर्तव्याला ' ॥

* ( २९ ) *

अपमाने आधीच खवळुनी गेला होता तो सिंह ॥
त्यात पाहिली देवगिरीची यवनांनीं भरली सीव ॥
दात ओठ खाऊन निघाला नीटच गेला चालून ॥
अग्निच होता पराक्रमाचा, दिधला भडका उडवून ॥
मनोहरावर पठाण तुटले चहूकडूनी त्वेषानें ॥
तोंच मागुनी हर ! हर ! ऐशी होय गर्जना जोमानें ॥
सेनापतिचा मुलगा पाहिल्या झटक्यासरसा लोळविला ॥
मर्मस्थानीं घाव घालुनी क्रूर मत्तगज खवळविला ॥
एक एक समशेर बहाद्दर शिलेदार नौबतवाले ॥
वीर मराठे शूर छातिचे चवताळुनि तेथें आले ॥
एकचि हाणामारी झाली रक्तानें भूमी न्हाली ॥
स्वर्गाच्या वाटेवर दाटी रणशूरांची बहु झाली ॥
सैन्यें तीं हट्टास पेटलीं युद्ध धुमाळी थांबेना ॥
" मारू किंवा मरूं " मनाचा निश्चय काहीं बदलेना ॥
अशा ऐन गर्दीच्या वेळीं घोडा पडला उलथून ॥
त्या सिंहाच्या सभोवतालीं वेढा पडला परतून ॥
मानाजी फाकडे जिवाजी पवार ' जरिपटकेवाले ॥
असले असले पंचहजारी तेथें कामाला आले ॥
शूर मनोहर लढता लढतां झाला युद्धीं बेहोष ॥
शर्थ जाहली पराक्रमाची, पडला कढाला शोष ॥
पुढचा पाय न मागें घेई जखमातूनी रुधिर गळे ॥
सय्यदमिर्झा ' सेनापतिला पाहुन तो तिकडेच वळे ॥

( २९ )

घोरपडे भोंसले ' धावले जीवाचे साथीदार ॥
मृत्यूच्या दारातहि घेउन होकारा जे देणार ॥
तोफा होत्या करीत ' धू धू ' आग भडकली शत्रूची ॥
उडी घातली घोरपड्यानीं धन्य तयांच्या छातीची ॥
दिली उडवुनी मोर्चेबंदी, खिळे ठोकिले कानांत ॥
हां हां ह्मणतां बगल मारुनी वर आले मैदानांत ॥
भले ! भले ! शाबास भोंसले निशाण हरिले यवनाचे ॥
कडाडले आकाश तयावर परसेना बिजली नाचे ॥
घोरपड्यांनीं कटाव केला घेउन भिडले पाठीला ॥
खरा भोंसला जग बहादुर हिंमत चढली मर्दाला ॥

* ( ३० ) *

अरे ! अरे ! पण काय देवगति ! दुसरा लोंढा हा आला ॥
वीजयश्रीचा नाथ मनोहर त्यात अहाहा ! सापडला ॥
प्रसंग मोठा कठिण आला भाल्याशीं भाला भिडला ॥
लीलेच्या सौभाग्यावरती शत्रूचा डोळा जडला ॥
एकसारखे घाव शिरावर झेलित असता ढाल तुटे ॥
' दीन दीन ' शब्दाचा तेव्हा कोलाहल मोठाच उठे ॥
घोरपडे ! सांभाळा, धांवा प्रसंग आणीबाणीचा ॥
पैंतावरतीं झोड उडाली मारा चाले खड्गाचा ॥
प्राणासाठीं प्राण द्यावया एकदमाने सरदार ॥
आले तोंची त्यानीं वधिला सेनापति मिर्झा ठार ॥
मोठा हाहाःकार उडाला तोबा ! तोबा ! ध्वनि उठला ॥
अरब रोहिले पठाण यांचा सेनाशकट्चि विसकटला ॥

( ३० )

रक्तानें थबथबलेली ती, आवेशानें भरलेली ॥
नरसिंहाची मूर्ति भासली मनोहराची श्रमलेली ॥
लढव्ये ते थक्क जाहले प्रणाम करिती कितीकदा ॥
मनात ह्मणती उगीच नाहीं हा रवि चढला भाग्यपदा ॥
निशाण डंके वाजत गाजत सेना वळली गडाकडे ॥
दिवस असुनी गडावरूनी एक चंद्र पाही इकडे ॥

* ( ३१ ) *

जखमाच्या वेदना भयंकर; साहूं जाणत नरवीर ॥
स्त्रिया मनाच्या कोमल त्यांचें भरतें दुःखानें ऊर ॥
अंथरुणावर पडला गाजी, हातानें मागे पाणी ॥
लीलेचें काळीज फाटलें डोळ्यांना पाणी आणी ॥
मंगळवार करीन ह्मणाली जगदंबे ! गे ! नेमानें ॥
सुखी ठेव वाटीन घरोघर सुवासिनींना मी वाणें ॥
प्राणविसावा तळमळ करितां मिळे विसांवा तिज कैसा ॥
पतिव्रतेचा मार्ग न इतरां पाळाया येई सहसा ॥
गडीमाणसें चाकर असता स्वता शरिरानें ती राबे ॥
पूर्वार्जित पुण्याविण असली पत्नी कोणाला लाभे ॥
शंकरदेव स्वतां येउनी घेती मित्र समाचार ॥
लीलेला वदती धैर्याच्या बोधाच्या गोष्टी चार ॥
सौंदर्याची जिची प्रसिद्धी लोकमुखानें त्यास कळे ॥
मनोरमा ती डोळे भरुनी पहावयाला रोज मिळे ॥
तारुण्याची चंचल दृष्टी, प्रभाव मोठा कामाचा ॥

" असा कोणकीं मोह न पडला ज्याला कांताकनकाचा " ॥
इष्ट असो कीं मित्र असो वा असो आप्त तो जातीचा ॥
' हजारांत एखादा असतो शीलवान जो जातीचा " ॥
विश्वामित्र वशिष्ट विधाता बुद्धि अशाच्याहि चळल्या ॥
तारापति निर्लज्ज जाहला इतरांच्या वार्ता कसल्या ॥
देवीचें राहिल एकदां दर्शन; लीलेचें न चुके ॥
कारण होतें मनोहराचें, तरि शंकेनें मन दचके ॥
विचार ज्याचे सरळ तयाला शंकेचें कारण काय ॥
" बुडोत कोणी श्रीगंगेचा प्रवाह वाहत तो जाय " ॥
वर्तन निष्पापाचें तेथें भीतीचें कारण नाहीं ॥
" थुकों कोणी नभीं; तयाच्या तोंडावर थुंकी येई " ॥
भीती शंका दोन्ही म्हटलीं भावंडें हीं पापाचीं ॥
अनीतिच्या मार्गावर बसलीं पिलें विषारी सापाची ॥
" विवेक ज्याचा त्याला असतो उपदेशक गुरु बोधाचा "॥
" भ्रष्ट मनाला अभिमत नसतो युक्त अर्थही वेदाचा " ॥

## * ( ३२ ) *

पतिव्रतेचा हात यशाचा, देवीचीही कृपाखरी ॥
ती सावित्री पति काळाच्या जवळुन आणी माघारी ॥
उठूं बसूं लागला मनोहर जीवाला आला धीर ॥
कृतार्थतेचें तिच्या लोचनीं चमके थोडेंसें नीर ॥
ती भक्ती, ती सेवा, तैसा शुद्धभाव त्या साध्वीचा ॥
यानीं त्याचा अर्धा झाला भाग कमी त्या व्याधीचा ॥
तास तास घालवूं लागली शंकर देवाची स्वारी ॥

त्यांना वाटे की आम्हावर राजाची मर्जी भारी ॥
जशी बकानें माशांना निज दांभिक वृत्ती दावावी ॥
ढोंगी साधून चेल्यावर किंवा माया पसरावी ॥
अज्ञानावर महाठगानें भुरळ आपुली घालावी ॥
कार्यसाधुनें अथवा जैशी वरवर साखर पेरावी ॥
हिंस्रपशूनें भक्ष्यासाठीं जशी शेपटी घोळावी ॥
मानभाव जो त्यानें जैशी खोटी ममता लावावी ॥
' वहिनी वहिनी ' करून तैशी गोडी तिजला तो लावी ॥
मनीं ह्मणे की ही चन्द्राची कला कशी हातीं यावी ॥
शुद्ध मनाची लीला तिजला अंतर त्याचें काय कळे ॥
" आत जयाच्या गाळ साचला सुंदर दिसतें तेंहि तळें " ॥
' भावोजी ' या शब्दानें ती कोकिळ कंठी बोलावी ॥
या पाप्याच्या दुर्बुद्धीची गोष्ट नसे तीच्या गांवी ॥
असेल अथवा कशी एवढा राजा आणी सन्मित्र ॥
कशी शिवावी दुष्ट कल्पना, असेल कां तो अपवित्र ? ॥
स्नेहप्रीती सहानुभूती भूतदया यांचा पुतळा ॥
साधे निष्कपटी ते दोघे, आवडला गोरा बगळा ॥
तिला सदोदित वाटे अपुल्या डोक्यावर होई ओझें ॥
बोटें घालुनि एक एक उपकाराच्या गोष्टी मोजे ॥

* ( २३ ) *

मनोहराचें आयु ह्मणावें की लीलेची पुण्याई ॥
आतां झाली प्रकृति चांगली दरबारी जाई येई ॥
एकेदिवशी जवळ कुठेशी दरबाराच्या कामाला ॥

जाणें आले. फुरसत नव्हती निरोप घरचा घ्यायाला ॥
सोंपविली शकरदेवावर मागें घरची तजवीज ॥
मानी बंधूसम तो त्याला विश्वासाचें काळीज ॥
सायंकाळीं वाट पाहतां ' लीला ' दाराशीं बसली ॥
साज होउनी दिवे लागले ' स्वारी ' पण नाहीं दिसली ॥
गुप्त बातमी ठाउक नव्हती पंतांच्या निर्गमनाची ॥
कशी कळावी तिला हकीकत, युक्ती शकरदेवाची ॥
अजुनि न येणें झालें बाई! कामच इकडे कीं फार ॥
असे मुखाने ह्मणत येई ती दाराशीं वारवार ॥
जीव तिचा खालींवर होई जों जों पडला काळोख ॥
गडी माणसें कां नच आलीं; गेले कोठें हे लोक ॥
निजले असतिल किंवा निजतिल लोक आपल्या घरोघरीं ॥
झोंकानें आलेली दिसली शकर-देवाची स्वारी ॥
विस्मित झाली, जरा दचकली थोडी मागेंही सरली ॥
धवल कांतिच्या चंद्रमुखावर शंकेची छाया फिरली ॥
कुरंगिणीचें चळवळणें वा तरंगिणीचें खळबळणें ॥
नागीणीचें तिच्या वरूनी येई दिसुनी वळवळणें ॥
रात्र असूनी, निजपती नाहीं, सदनीं परका पुरुष कसा ॥
स्तंभित झाली तोंच ऐकुनी निजनामाचा ध्वनि सहसा ॥
ज्या तोंडानें ' वहिनी ' वाचुन दुसरें नाव न ती ऐके ॥
' लीले ' ऐसा त्या तोंडानें शब्द न ऐकायास शके ॥
प्रकाश पडला, वीज चमकली भीषणता वाढली अती ॥
पुढच्या गोष्टी ओळखुनी गंभीर जाहली ती सुमती ॥

* ( ३४ ) *

लीले कां भ्यालीस तुझ्या या परिचित शंकरदेवाला ॥
देवि ! तुझ्या अनुरागाचा मी कौल लाविला दैवाला ॥
हृदयपटीं कोरून मूर्ति तव पूजन करितों अहर्निशीं ॥
विदारुनी ती अपुल्या हातें दावूं तुज सुंदरी कशी ॥
तुझ्या चिंतनीं नामस्मरणीं अनुदिनि मी असुनी रमणी ॥
खरें सांगतों जरा स्थीरता नाहीं मम अंतःकरणीं ॥
उदास वाटे, काळ न लोटे, उपाय मोठे जरि करितो ॥
चक्षुपुढें तव मूर्ति आणुनी कांही शांतीला वरितों ॥
जनलज्जा कीं मनलज्जा पण धैर्य न झालें बोलाया ॥
आलो आजी दृढ प्रीतिची गांठ मनाची उकलाया ॥
ज्या दिवशीं तव दर्शन झालें मी त्या दिवसांपासून ॥
आजवरी आशावल्लीला वाढविलें जोंपासून ॥
टाकुंनको जाळून तियेला निर्दय ऐशी होउंनको ॥
सोड मुग्धता आशापूर्तीची वाणी तव मी ऐकों ॥
तुझ्या गळ्याची शपथ वाहतों पाहु नको माझा अंत ॥
त्वत्प्रीतीचें जल पाजी मज तृषा लागली बलवंत ॥
सांग तुझ्या या निश्वासाचा अर्थ तरी समजूं काय ॥
एक शब्द तरि बोल सुखाचा जेणें तळमळ ही जाय ॥
येथवरी ती ऐकत होती कशी तरी पापी वाचा ॥
खाली वर भुवई होवोनी रंग बदलला नेत्राचा ॥

* ( ३५ ) *

सरली कटुतर जी ऐकाया पापविचारांची पक्ती ॥
स्रवूं लागली सरस्वतीची कर्णविहारी रसवंती ॥

" अनेक दुःशद्बानीं माझ्या चित्तीं तळमळ लावोनी ॥
काय अपेक्षा करिता माझा एक शद्ब तो वदवूनी ॥
प्रीतीची याचना नसे, ही अघोर तृष्णा पापाची ॥
या पापानें होळी झाली कित्येकांच्या जीवाची ॥
परस्त्रियेच्या अभिलाषानें रावण सर्वस्वा मुकला ॥
सती द्रौपदीमुळें एकही कौरव जगतो नच उरला ॥
सैरंध्रीच्या प्रबलेच्छेने कीचक पंचत्वीं गेला ॥
ठाउक असतां विषम मार्ग हा का अविचारें सेवियला ॥
उभें राहुनि नरकाच्या मार्गावर मजला बोलवितां ॥
अधःपात घडवुनी स्वताचा माझाही कां तो करिता? ॥
धर्म अर्थ कामानें ज्याशीं वचन-बद्धता मम झाली ॥
व्याया का लाविता तयाच्या सुख सर्वस्वीं तिलांजलि ॥
मुकते गेले परलोकीं जे वंदनीय तुमचे तात ॥
यत्कीर्तीचा सुगंध साऱ्या पसरुनि गेला जगतांत ॥
त्यांचे तुह्मी पुत्र; आमचे पालन कर्ते ह्मणवीतां ॥
धवल यशावर अपुल्या हातें काजळ कैसें फिरवीतां ॥
पतिव्रतावर घाले पडतां ज्या हातानीं चुकवावे ॥
त्या हातानीं पतिव्रतावर घाले कैसे घालावे ॥
पसरुनि हिरवी छाया आम्रानें वनवासी सुखवावे ॥
प्रभजनानें निराश्रितांवर त्याने कैसें उमळावें ॥
गरुडखगेश्वर समर्थ ज्यानें गिरिशिखरें उलंघावीं ॥
हंसीनें पण गळ्यात त्याच्या माळा कैशी घालावी ॥
सिंहाला मृगपति अथवा वनराज मिळाली जरी पदवी ॥

करिणीनें सागा हो ! कैसी प्रीति त्याला अर्पावी ॥
असला पचम कठमणी पिक वसंत काविही गाणार ॥
भारद्वाजीनें अर्पावा कैसा त्याला हो हार ॥
पोषाखाची ऐट कशाला मजला दावाया आला ॥
सजला नंदी कामधेनु का माला घालील बैलाला ॥
तुमच्या विषयीं आदरबुद्धी वाढत होती ती माझी ॥
खरें सांगतें मला परीक्षा झाली नाहीं भावोजी ॥
सुवर्ण घट वाटला सुधेचा कांजी तेथे आढळली ॥
भलत्याला कोकिळ ह्मणण्याची अजाणता माझी कळली ॥
ती वत्सलता उदात्तता ती पवित्रता कोठें गेली ॥
त्यांचें खत घालून काय दुर्मतिची वल्ली वाढविली ॥
हिचीं फळें बहु विषमय येतिल तुह्मां काय मी सांगावें ॥
" प्रसग येता बोलायाचें स्पष्ट बोलुनी टाकावें " ॥

* ( १६ ) *

चढला कठ तिचा वदता जणु चाले वीणा झकार ॥
" मूर्ख पशूला कसा कळावा भगवद्गीतेचा सार " ॥
उलट ह्मणाला " नको सुखाच्या संसारीं माती घालूं ॥
मगराशीं पाण्यात राहुनी वैर कसें करिशी चालू ॥
माझ्या आशेवरी निखारे ठेवशील जरि हट्टानें ॥
दुर्दिन येतिल रडावयाचे तुला मोकळ्या कठानें ॥
अपमानाचें गरल ओकशी शुद्धी गेली काय तुझी " ॥
मला वाटतें तुझ्यावरी कीं फिरली दैवाची मर्जी ॥
सहन न झाले शब्द तयाचे क्रोधानें साध्वी वदली ॥

" शोभत नाही तुमच्या तोंडीं घाणेरी भाषा असली ॥
खबरदार टाकाल एकही पाय आपुला जरि पुढती ॥
आपटून भूशिलेवरी शिर, जीवचि देइन निर्धारीं ॥
विहराया सांपडली वाटे तुह्मा बरी ही निर्झरिणी ॥
रहा बसोनी काठावरती प्राणाच्या बुडविन डोहीं ॥
शीलाचें सरक्षण करिता प्राणाची परवा काय ॥
कस्तूरी मातींत मिळविली सुगध सोडिल ती काय ? ॥
कापुन काढा छेदुन टाका तोफेला बांधा काय ॥
अशुद्ध जीवित वाहुनि हृदयीं कसास लावावी हाय ॥
कशास भीती मला घालतां तुह्मी न दैवाचे नियते ॥
तुफान दर्या झाला तरिही सतीत्व ठेविन मी पुरतें ॥
हिमालयाचीं विशाल शिखरें गौरीशंकर धवलगिरी ॥
कडेलोट तेथून होउनी देह जाहला चूर्ण जरी ॥
घालूं ह्मटला सर्पमुखीं घालीन सुखानें हात परी ॥
पतिव्रतेचा मार्ग न सोडिन ब्रह्मदेव येईल जरी " ॥
" ब्रह्मदेव पाहिजे कशाला स्वर्गावरचा यायाला " ॥
असें ह्मणोनी त्या अधमानें दिवा तेथला मालविला ॥
" धावा ! धांवा ! ह्मणून फुटला हंबरडा त्या गाईचा " ॥
" आलों लीले ! नको घाबरू ध्वनि येई तो ओळखिचा " ॥
लीला चटकन् मागें सरली स्पर्श न झाला देहाला ॥
" पतिव्रतेवर घाला पडता करुणा येते देवाला " ॥
दोघाची चालली झटापट; घावावर बसती घाव ॥
काळोखांत दिसेना त्यांच्या क्रौर्याचा आविर्भाव ॥

हाय ! हाय ! करितांना आला एक खालतीं घायाळ ॥
बोले–" प्राणप्रिये ! चाललों पातिव्रत्या सांभाळ ॥
निजनाथाचा शब्द ऐकतां दिवा घेउनी तात्काळ ॥
आली त्याच्या जवळ पेटला; पोटीं दुःखाचा जाळ ॥
छातींतूनी मळमळवाहे प्रवाह त्याच्या रुधिराचा ॥
होता जवळच देह उभा तो मित्र घातकी अधमाचा ॥
गेला नव्हता प्राण अजूनी जाण्याच्या मार्गीं होता ॥
लीला साध्वी खरी सती ती; त्वरा जाहली तिज आतां ॥
कट्यार पतिच्या उरांतली निजकरांत आवेशें धरिली ॥
हां ! हां ! ह्मणतां पवित्र हृदयीं खोंचुन खाली ती पडली ॥
पडतां पडतां धरणीवरती हात मारुनी मग वदली ॥
" नराधमा ! होईल घात तव सर्वस्वाचा थोर कुळीं " ॥
मान ठेविली पतिच्या कंठीं झोंप लागली दोघांना ॥
पापात्मा तो पुसीत होता अपुल्या ओल्या नयनांना ॥ ४०९

* ( ३७ ) *

दिल्लीच्या फौजेची मागे धूळधाण झाली होती ॥
सूड तियेचा उगवायाला फौजांवर फौजा येती ॥
विजयश्रीला नाथ मनोहर नाहीं अपुला आढळला ॥
एक वेळही शकरदेवाकडे तिचा पाय न वळला ॥
दिल्लीचा सेनापति काफुर काळाचा जणु दंड अहा ! ॥
गाठ तयाशीं रणांगणीं शकरदेवाची पडे पहा ॥
टाकुनि जाळें चहूंबाजूनीं मगर घेरिला कोल्यानें ॥
कोपें चावे ओठ स्वताचे मुख भरलें निजरुधिरानें ॥

घालुनि छापा प्रमत्तकुंजर अधम पातकी तो धरिला ॥
करुनि शृंखलाबद्ध तयाला गडावरी ओढुन नेला ॥
लांच दिली पाहरेकऱ्यांना सुटला रात्रीच्यासमयीं ॥
झोंपेमध्यें खून कराया प्रवृत्त झाला अन्यायी ॥
पाप्याचीं पातकें किती तीं सहन करावीं देवानें ॥
पडता शेवटचा तैं बिंदू तत्घट भरला पापानें ॥
पाळत ठेवुन अनुचर आले दोघे चौघे धावून ॥
वरच्यावरती खुनी हात छेदून टाकिला मागून ॥
भोसकला भाला दुसऱ्यानें पोटातुन बाहिर आला ॥
देव कशाचा असुर भूमिवर तोंडावर उपडा पडला ॥
तो गोंधळ ती गडबड ऐकुन काफुर दचकोनी उठला ॥
जीवावरचा प्रसंग टळला भजला तोंडानें ' अल्ला ' ॥
'उचला शव हें तुकडे करुनी गृध्रवृकापुढती घाला ॥
रणशूराची सद्गति न मिळो अशा घातकी नीचाला ॥'
स्फूर्तिप्रद चैतन्यविलासी देवगिरीचा इतिहास ॥
त्याला अतीं डाग लागुनी ऐसा झाला हो ऱ्हास ॥
बालेंदूरेखांकित हिरवा दिल्लीचा ध्वज फडफडला ॥
यवनाच्या ताब्यांत अहाहा देवगिरी गेला गेला !!॥
यादववंशीं दिवा लावण्यास्तव कोणी एक न उरला ॥
" पतिव्रतेचा घात करूनी कोण सुखी भुवनीं झाला !" ॥ ४२३

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १८२७...

REFBK-0001827

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. | पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. | पान | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ६ | मागुनी | मागुन | ७ | १९ | नामे | नामें | २७ | १७ | रिपुची | रिपूची |
| ३ | १९ | पक्षींगणांना | पक्षिगणांना | ९ | ९ | चोरून | चोरुन | २९ | १३ | कठिण | कठीण |
| ३ | १९ | शेत करी | शेतकरी | १० | ५ | येईन | येइन | २९ | १८ | खड्गाचा | खड्गांचा |
| ४ | ५ | गरीब | गरिबु | १३ | १ | बोलुं | बोलू | ३० | १५ | ती | ० |
| ४ | १२ | ही | ० | १३ | १४ | शकूनें | शकुनें | ३१ | ४ | वशिष्ट | वशिष्ठ |
| ४ | १६ | रास्मिजाल | रश्मिजाल | १३ | १४ | ठेवि | ठेवी | ३१ | ६ | राहिल | राहील |
| ५ | १३ | देवांचे | देवांचे | १३ | १६ | होईल | होइल | ३१ | १६ | कृपाखरी | कृपा खरी |
| ५ | १५ | उजाडतांना | उजाडतां | १६ | १२ | का | काय | ३३ | ९ | येई | येइ |
| ५ | २० | धमल | धवल | १७ | १० | बसतो | बसतो | ३५ | २० | त्याने | त्यानें |
| ६ | १२ | पाहून | पाहुन | | | एकांतीं | बसला | ३६ | ४ | आला | आलां |
| ६ | १५ | वेशिजवळ | वेशीजवळ | | | | एकातीं | ३६ | ५ | घालील | घालिल |
| ७ | २ | उठ रे! | ऊठ रे! | १७ | १३ | तारुं | तारू | | | | |